## प्रयत्न आणि नशीब यांची निरगाठ: एक काल्पनिक संघर्ष

आपण सर्वजण वर्तमान काळ आणि तो स्वतःच्या फायद्यासाठी बदलण्याचा प्रयत्न यामधील संघर्ष जवळजवळ सतत अनुभवत असतो. त्यामुळे, नशीब (प्रारब्ध) आणि प्रयत्न (पुरुषार्थ) यांच्यात कायमस्वरूपी संघर्ष असतो असे आपण गृहीतच धरतो. परंतु, असा संघर्ष मान्य करणे ही एक निर्णायक चूक आहे आणि त्याचबरोबर ती नशीब आणि प्रयत्न म्हणजे प्रत्यक्षात काय याबद्दलच्या स्पष्टतेचा अभावही दर्शवते. सत्य हे की, दोन्हीही स्वप्रयत्नांवर आधारित आहेत आणि आपल्याच कृतींच्या सातत्याचा परिणाम आहेत; 'नशीब' आणि 'प्रयत्न' या वेगवेगळ्या संज्ञा केवळ आपण आपल्या कृतींकडे कोणत्या कालमर्यादेच्या खिडक्यांमधून पाहतो, यामुळे उद्भवतात. याविषयीची पूर्ण स्पष्टताच आपल्याला हे समजण्याची क्षमता देईल की नशीब आणि प्रयत्न यांच्यात कधीही संघर्ष नव्हता आणि असूही शकत नाही; आणि अशा तऱ्हेने आपण आपल्या नशिबाचे खरे मालक आहोत या तथ्याची आपल्याला जाणीव होईल.

## नशीब आणि स्वप्रयत्नाची व्याख्या

नशीब म्हणजे आपल्या स्वतःच्या भूतकाळातील कृतींचा वर्तमानात व्यक्त होणारा अपरिहार्य परिणाम होय. हाच विचार मांडत, योगवासिष्ठ (२.६.३५) सांगते: *"प्राक्तनं पौरुषं तद्वै दैवशब्देन कथ्यते* - भूतकाळातील प्रयत्नांनाच 'नशीब' असे म्हटले जाते". या संकल्पनेचे अधिक विश्लेषण करताना योगवासिष्ठ (२.९.६) स्पष्ट करते:

**भावी त्ववश्यमेवार्थः पुरुषार्थैकसाधनः।**
**यः सोऽस्मिन् लोकसङ्घाते दैवशब्देन कथ्यते॥**

स्वतःच्या प्रयत्नांमुळे घडून येणारा भविष्यातील अटळ परिणाम या जगात 'नशीब' म्हणून ओळखला जातो.

नशीबाचा निर्देश करण्यासाठी तीन पर्यायी संस्कृत संज्ञा वापरल्या जातात: प्रारब्ध, दैव किंवा अदृष्ट. जरी या सर्वांचा मूळ अर्थ 'नशीब' असला तरी, प्रत्येक संज्ञेच्या अर्थाची एक वेगळी छटा आहे. 'प्रारब्ध' ह्या संज्ञेचा शब्दशः अर्थ 'चांगले सुरू झालेले' असा आहे आणि ते अशा गोष्टीचा संदर्भ देते ज्याचे फळ मिळण्यास आधीच सुरुवात झाली आहे – प्रकर्षेण आरब्धम्. 'दैव' याचा अर्थ 'दैवी आज्ञा' असा होतो आणि अशा प्रकारे नशीब म्हणजे वैश्विक देवतांनी आपल्या सर्वोच्च आंतरिक उन्नतीसाठी प्रदान केलेले असे मानले जाते – देवलोकाद् इहागत्य लोकद्वयहितं भवेत्. (योगवासिष्ठ २.६.३५). 'अदृष्ट' म्हणजे 'अदृश्य', हे नशीब प्रत्यक्ष अनुभवाला येण्यापूर्वी ते समजण्याची आपली अंगभूत अक्षमता व्यक्त करते.

स्वप्रयत्नांसाठी वापरल्या जाणाऱ्या संस्कृत संज्ञा आहेत, 'पौरुषम्', ज्याचा शब्दशः अर्थ 'मानवी प्रयत्न' म्हणजेच 'स्वप्रयत्न' असा होतो. 'स्वप्रयत्न', म्हणजेच 'वैयक्तिक प्रयत्न'; किंवा 'पुरुषकार', म्हणजेच 'मानवी प्रयत्न'. 'पुरुषार्थ' ही आणखी एक सामान्यतः वापरली जाणारी संज्ञा आहे, ज्यामध्ये 'अर्थ' म्हणजे मानवांनी त्यांची वैयक्तिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी केलेले प्रयत्न (पुरुषैः अर्थ्यते)[१].

---

[१] "अर्थ्यते' म्हणजे 'जे मिळवायचे आहे ते'. ध्येय म्हणून त्याचा अर्थ 'चतुर्विध पुरुषार्थ' म्हणजे चार प्रकारचे मानवी ध्येय असा होतो – धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष. ही ध्येये फक्त मानवी इच्छा आणि प्रयत्न ह्याद्वाराच साध्य होऊ शकतात, त्यामुळे प्रयत्नाचा समावेशही ह्या साध्याच्याच प्रतलावर होतो. त्यामुळे स्वप्रयत्न सुद्धा "पुरुषैः अर्थ्यते" (जे मानवी जीवांना मिळवायचे आहे ते) च्या विस्तारित निर्देशाच्या कक्षेतच येतो आणि 'पुरुषार्थ' ह्या संज्ञेने संबोधिला जातो.

**कालचे स्वप्रयत्न, आजचे नशीब**

नशीब म्हणजे आपल्याला वर्तमानात परिस्थिती म्हणून जे सामोरे येते ते आहे, परंतु वर्तमान हा निव्वळ भूतकाळातील घटनांचीच अखंड शृंखला आहे. त्यामुळे, वर्तमानात जे नशीब म्हणून व्यक्त होते ते दुसरे तिसरे काही नसून आपल्या भूतकाळातील कृतींचे म्हणजे प्रयत्नांचेच फळ आहे. अशा प्रकारे, स्वतःचे प्रयत्नच आपल्या नशिबाचे खरे शिल्पकार आहेत. पुरुषार्थामुळे प्रारब्धावर परिणाम होत असल्याने, योगवासिष्ठ (२.६.२) स्पष्टरीत्या सांगते की स्वप्रयत्न आणि प्रारब्ध ह्यामधील भेद हा केवळ वरवरचा आहेः

**यथा यथा प्रयत्नः स्याद्भवेदाशु फलं तथा।**
**इति पौरुषमेवास्ति दैवमस्तु तदैव च॥**

जशा तऱ्हेने प्रयत्न केले जातात, खरोखर त्याच प्रकारे फळ मिळते. म्हणून, फक्त प्रयत्न हेच 'नशीब' आहे.

जर नशीब, म्हणजे वर्तमानात सामोऱ्या येणाऱ्या परिस्थिती हा भूतकाळातील प्रयत्नांचा परिणाम वा सर्व प्रयत्नांचा एकत्रित परिणाम असेल[२], तर साहजिक रीत्या आपण वर्तमानात ज्या प्रकारे वागतो त्याचा भविष्यावर नक्कीच मोठा परिणाम होईल. म्हणून शास्त्राची शिकवण अशी आहे की: नशिबापुढे हार मानू नका, तर स्वप्रयत्नांना वाहून घ्या. नशिबावर विसंबून राहणे म्हणजे प्रयत्नांच्या सामर्थ्याला विसरणे होय, ज्यामुळे आळसाला वाट दिली जाते, भविष्य उद्ध्वस्त होते आणि स्वतःच्या उन्नतीचा मार्ग रोखला जातो.

[२] योगवासिष्ठ (२.६.४) नुसारः प्राक्स्वकर्मेतराकारमं दैवं नाम.

**प्रारब्धाचा (नशिबाचा) धैर्याने सामना करणे**

गुरुदेव स्वामी चिन्मयानंद असे प्रतिपादन करतात: "जीवनात जे काही वाट्याला येते ते 'प्रारब्ध' (नशीब) आहे; त्याचा आपण किती समर्थपणे सामना करतो तो 'पुरुषार्थ' (स्वप्रयत्न) आहे."[३] जर फक्त भूतकाळातील पुरुषार्थच अपरिहार्य 'प्रारब्ध' म्हणून व्यक्त होत असेल आणि वर्तमानकाळातील स्वप्रयत्न हा 'पुरुषार्थ' किंवा 'पौरुष' असेल, तर असा प्रश्न उद्भवतो की, स्वतःच्या पुरुषार्थाने स्वतःच्या प्रारब्धावर विजय मिळवणे शक्य आहे का? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी, खालील दोन आवश्यक परंतु संबंधित प्रश्नांचे निराकरण करणे अनिवार्य आहे: (१) भविष्यात प्रारब्धाने आपल्यासाठी काय वाढून ठेवले आहे, हे जाणून घेणे शक्य आहे का? (२) आपल्या प्रारब्धाच्या सापेक्ष शक्तीचा अंदाज घेणे शक्य आहे का, जेणेकरून जर प्रारब्ध नकोशा स्वरूपाचे असेल, तर त्यावर मात करण्यासाठी आपण आवश्यक प्रयत्न करू शकू?

काही उच्च प्रगत आत्मे किंवा ज्यांच्याकडे काही सिद्धी (अलौकिक शक्ती) आहेत, त्यांच्याव्यतिरिक्त इतरांना भविष्यात प्रारब्धाने आपल्यासाठी काय वाढून ठेवले आहे हे जाणून घेणे शक्य नाही. याचे कारण असे की, आपल्या पूर्व जन्मात केलेली कर्मे आपल्याला आठवत नाहीत. वर्तमान हे केवळ ह्या जन्मामधील वा त्याच्या आधीच्या जन्मातील एखाद्या विशिष्ट कर्माचे फळ नसते तर तो सर्व मागील जन्मांतील सर्व कर्मांचा एकत्रित परिणाम असतो. आणि आपण असंख्य मागील जन्मांत केलेल्या अगणित कर्मांची आपल्याला स्मृती नसल्यामुळे, भविष्याचा अंदाज वर्तवणे तर्कदृष्ट्या अशक्य आहे. 'संचित' नावाच्या मागील कर्मांच्या साठ्यातून, जेवढे कर्म वर्तमान जन्मासाठी फलद्रूप होते त्याला 'प्रारब्ध' म्हणतात आणि फलद्रूप होणाऱ्या कर्मांच्या या प्रमाणात सुद्धा, ती कोणत्या क्रमाने फळ देतील हे जाणून घेणे आपल्याला शक्य नसते. एखाद्याला वाटू शकते की ही स्मृती नसणे हा एक शाप आहे; याउलट, हा एक 'छुप्या रूपातील आशीर्वाद' आहे — सर्वशक्तिमान ईश्वराकडून मिळालेली एक स्वागतार्ह भेट आहे —

कारण आपल्या वर्तमान पुरुषार्थात अडथळा आणणाऱ्या आणि आपल्याला निराश करणाऱ्या भूतकाळाच्या ओझ्यावाचून आपण आता मुक्त आत्मे आहोत, जे पूर्ण आत्मविश्वासाने आपल्या स्वतंत्र इच्छेचा (Free will) वापर करू शकतात, जेणेकरून वर्तमानातील नको असलेल्या प्रारब्धावर आनंदाने आणि आशावादाने मात करता येईल. खरोखर, सकारात्मक मनातून उद्भवलेला एक सक्रिय प्रयत्न आणि आपल्या मागील जन्मांच्या व त्यामध्ये केलेल्या कर्मांच्या स्वागतार्ह विस्मरणामुळे सुलभ झालेला प्रयत्नच सकारात्मक परिणाम आणू शकतो.

-----------------------------------------------

[३] फाउंडेशन वेदान्त कोर्स, धडा ४ (चिन्मय इंटरनॅशनल फाउंडेशनद्वारे प्रकाशित, २०१०) पाहा.

---

पुढच्या प्रश्नाकडे वळताना, आपल्याला आपल्या मागील कर्मांच्या ज्ञानापर्यंत पोहोचता येत नसल्यामुळे, हे स्वाभाविकच आहे की जोपर्यंत प्रारब्ध वर्तमानात अनुभवल्या जाणाऱ्या परिस्थिती किंवा प्रसंगांच्या (म्हणजेच सुख आणि दुःखाच्या) रूपात प्रकट होत नाही तोपर्यंत आपल्या पुरुषार्थाच्या तुलनेत प्रारब्धाची सापेक्ष ताकद सुद्धा अज्ञातच राहील. परंतु वर्तमानात सुद्धा, जेव्हा आपण प्रारब्ध नावाच्या नको असलेल्या परिस्थितीचे निरीक्षण करतो, तेव्हा त्यावर विजय मिळवण्यासाठी किती प्रमाणात प्रयत्न करावे लागतील हे आपल्याला कसे कळणार? एखाद्या वजनाला उचलण्यासाठी जसे आपण 'क्ष' प्रमाणात ऊर्जा खर्च करतो किंवा 'य' प्रमाणात प्रयत्न करतो, तशी याची गणना करता येत नाही. तथापि, याचा अर्थ असा नाही की प्रारब्धाच्या शक्तीचा अंदाज घेणे प्रत्यक्षात अशक्य आहे. जेव्हा आपण आयुष्यात झोकून देतो आणि त्यावर मात करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हाच आपण आपल्या प्रारब्धाची ताकद मोजू शकतो. जेव्हा परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी केवळ थोड्या प्रयत्नांची गरज असते, तेव्हा आपल्याला समजते की हे 'मंद-प्रारब्ध' (कमकुवत प्रारब्ध) आहे; आणि जेव्हा अधिक प्रयत्नांची आवश्यकता असते, तेव्हा आपण त्याला मध्यम श्रेणीचे प्रारब्ध ('मध्यम-प्रारब्ध') म्हणून ओळखतो; आणि जेव्हा त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी खूप प्रयत्न आणि पर्यायाने खूप वेळ लागतो, तेव्हा आपण अशा प्रारब्धाला 'तीव्र-प्रारब्ध' (बलवान प्रारब्ध) म्हणतो.

थोडे अधिक विश्लेषण केले तर वर चर्चिलेले मुद्दे अधिक स्पष्ट होतील. दोन विरोधी योद्ध्यांची सापेक्ष ताकद जाणून घेण्यासाठी, प्रत्यक्ष निरीक्षण लागते आणि त्यासाठी दोघांचेही उपस्थित असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, जोपर्यंत प्रारब्ध निरीक्षणासाठी स्वतःला व्यक्त करत नाही, तोपर्यंत पुरुषार्थाच्या तुलनेत त्याची खरी ताकद आपल्याला कशी समजणार? समजा, येणाऱ्या कुस्तीच्या सामन्यात आपण दोन पहिलवानांपैकी फक्त एकालाच पाहतो. कोण जिंकेल हे सांगणे शक्य होईल का? नाही ना? जोपर्यंत आपण दोघांनाही एकत्र पाहू शकत नाही, तोपर्यंत विजेता कोण असेल हे सांगण्याची सुतराम शक्यता नाही. जीवनातली परिस्थितीही तशीच आहे. आपल्या पुरुषार्थाविषयी (स्वप्रयत्नांविषयी) आपल्याला पूर्ण खात्री असली तरी आपले प्रारब्ध पूर्णपणे जाणून घेता येत नाही; म्हणूनच, प्रारब्ध किंवा पुरुषार्थ या दोघांपैकी कोण विजयी ठरेल हे समजणे अशक्य आहे. परंतु तरीही कोणी असा युक्तिवाद करू शकेल की: भविष्यात येणाऱ्या प्रारब्धाच्या बाबतीत हे खरे असले तरी, वर्तमानात व्यक्त होत असलेल्या प्रारब्धाचे काय? प्रारब्ध हे आपण वर्तमानात ज्या परिस्थितींना तोंड देतो त्या रूपात व्यक्त होत असल्याने आणि पुरुषार्थ म्हणजे आपण त्यांना वर्तमानात किती समर्थपणे सामोरे जातो हे असल्याने आणि दोन्ही निरीक्षणासाठी उपलब्ध असल्याने, या दोघांपैकी कोण बलवान आहे हे ठरवणे शक्य आहे का? येथे सुद्धा, खुर्चीवर आरामात बसून कोण बलवान आहे हे ठरवणे शक्य नाही. दोघांची सापेक्ष ताकद पाहण्यासाठी पुरुषार्थाचा प्रत्यक्ष वापर करणे आवश्यक आहे. हे असे आहे: एकमेकांचा सामना करण्यासाठी सज्ज असलेल्या दोन पहिलवानांचे केवळ दर्शन आपल्याला दोघांपैकी चांगला योद्धा कोण आहे हे ठरवण्यास मदत करणार नाही. एखादा अधिक बलवान आणि भक्कम शरीरयष्टीचा दिसू शकतो, पण केवळ त्यामुळे विजयाचे आश्वासन मिळू शकत नाही, कारण दुसरा अधिक चपळ असू शकतो आणि त्याच्याकडे अधिक

चांगले प्रशिक्षण असू शकते. जोपर्यंत प्रत्यक्ष लढत होत नाही, तोपर्यंत दोन पहिलवानांपैकी कोण सरस आहे हे ठरवणे कधीही शक्य होणार नाही. जीवनातही हेच सत्य आहे — आपल्याला त्यांची सापेक्ष गुणवत्ता आणि ताकद प्रत्यक्षपणे ओळखण्यासाठी प्रारब्ध आणि पुरुषार्थ या दोन्हीमध्ये संघर्ष आणि एकमेकांवर क्रिया होणे आवश्यक आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की 'प्रारब्ध' आणि 'पुरुषार्थ' हे दोन्ही एकाच पुरुषार्थाची भिन्न रूपे आहेत: प्रारब्ध म्हणजे भूतकाळातील पुरुषार्थाचे व्यक्तीकरण आहे, तर पुरुषार्थ म्हणजे तो प्रयत्न जो वर्तमानात केला जात आहे. अशा प्रकारे, पुरुषार्थ हा प्रारब्ध आणि पुरुषार्थ या दोघांचाही गाभा असल्याने, यापैकी कोण अधिक बलवान आहे हा वाद शेवटी निराधारच ठरतो — कारण ते दोन नसून एकच आहेत. म्हणून, आपले नशीब घडवण्यासाठी, आपण कोणत्याही परिस्थितीत पुरुषार्थाचा अवलंब केला पाहिजे, कारण वर्तमान पुरुषार्थच कालांतराने नशिबाच्या रूपात विकसित होतो. तर्कदृष्ट्या योग्य वृत्ती अशीच असावी की: "मी या नको असलेल्या नशिबावर मात करेन — आज नाही तर उद्या; उद्या नाही तर परवा; पण काहीही झाले तरी मी विजय मिळवीनच." अशा अंतर्मनात ध्येयाची आग प्रज्वलित असलेल्या माणसांसाठी काहीही मिळवणे अशक्य नाही. हे शहाणपण जपत, द्रविड भूमीतील 'तिरुक्कुरल' पुढील द्विपदींमध्ये (६१९, ६२०) आत्यंतिक पुरुषार्थाचा आग्रह धरते:

नशिबामुळे एखादा प्रयत्न हवा असलेला निकाल देऊ शकला नाही तरी, केलेल्या श्रमाचे फळ तो नक्कीच देईल; तो कधीही वाया जाणार नाही.

जे कधीही कमी न होणाऱ्या उत्साहाने भारलेले असतात आणि प्रामाणिकपणे श्रम करतात, ते नशिबाला मागे टाकतील आणि त्याचा पराभव झालेला त्यांना बघता येईल.

(जपानी जनरल नोबुनागांच्या जीवनातील एक किस्सा या मुद्द्याचे यथार्थ दर्शन घडवतो. शत्रूचे सैन्य आपल्यापेक्षा दहापट जास्त असूनही जनरल नोबुनागांनी शत्रूवर हल्ला करण्याचा निर्णय घेतला. नोबुनागांना स्वतःला विजयाची पूर्ण खात्री असली तरी त्यांचे सैनिक मात्र भयभीत झाले होते. समोर उभ्या ठाकलेल्या अगदी निश्चित अशा मृत्यूच्या छायेत, सैनिकांनी जनरलांना विनंती केली की त्यांना त्यांच्या अपरिहार्य नशिबाला सामोरे जाण्यापूर्वी देवाची किमान प्रार्थना तरी करण्याची परवानगी द्यावी. त्यांची विनंती मान्य करून नोबुनागा एका शिंतो मंदिरात थांबले प्रार्थनेनंतर नोबुनागांनी घोषित केले, "मी आता एक नाणे फेकीन. जर छाप पडला तर आपण जिंकू. जर काटा पडला तर आपण हरू. देव आपले नशीब आपल्याला दाखवेल." त्यांनी नाणे फेकले. छाप पडला. सैनिकांमध्ये लढण्यासाठी इतका उत्साह संचारला की त्यांनी शत्रूच्या अवाढव्य सैन्याचा पूर्णपणे पराभव केला. दुसऱ्या दिवशी, नोबुनागांच्या सहाय्यकाने त्यांना म्हटले, "कोणीही नशीब बदलू शकत नाही." "बरोबर," जनरलांनी त्याला त्यांनी फेकलेले नाणे दाखवत म्हटले. त्या नाण्यावर दोन्ही बाजूंनी छाप होता. खरोखर, आपणच आपल्या नशिबाचे शिल्पकार नाही का?

बऱ्याचदा असे वाटते की प्रारब्धाची विरोधी ताकद खूपच प्रबळ आहे आणि ते जिंकायला अवघड आहे. परंतु प्रारब्ध जो कडक विरोध करते, तेवढ्यावरूनच ते स्वतंत्र इच्छेच्या क्रियेवर मात करते असा निष्कर्ष काढणे पुरेसे नाही. प्रारब्धाने निर्माण केलेला अडथळा उलट आपल्यासाठी एक मोजमाप ठरतो की, प्रारब्धाच्या ताकदीला पराभूत करण्यासाठी आपण किती प्रमाणात पुरुषार्थ एकवटला पाहिजे. तसेच, पुरुषार्थाच्या फलप्राप्तीला प्रारब्धाचा विरोध दिसतो त्यावरूनच आपण हा अंदाज वर्तवू शकतो की, वर्तमानातील नशीब घडवण्यासाठी भूतकाळात किती पुरुषार्थ खर्च झाला आहे, कारण प्रारब्धामुळे निर्माण झालेला अडथळा हा भूतकाळातल्या पुरुषार्थाचेच रूपांतर आहे, मग ते स्वतःच्या हिताच्या विरुद्ध का असेना. पण प्रारब्धाच्या या अडथळ्याशिवाय, आपण आपल्या भूतकाळातील कर्मांच्या बाबतीत कधी शहाणे कसे होणार? किमान या कारणासाठी तरी, आपल्या वरवर विरोधी वाटणाऱ्या नशिबाला माघार

घेण्यास भाग पाडणारा नाउमेदी शत्रू मानण्यापेक्षा, यश मिळवण्यासाठी अधिक प्रयत्न करायला प्रोत्साहित करणारा स्वागतार्ह मित्र मानले पाहिजे.

अधिक स्पष्टतेसाठी: एखादे फळ मिळवण्यासाठी, काही विहित कृती असते. जरी परिश्रमाने प्रयत्नांची जोड दिली की यशाची खात्री असली, तरी कृती सुरू करण्यापूर्वी आपण कधीही त्या विहित कृती कितीदा कराव्या लागतील किंवा त्यांची तीव्रता समजू शकत नाही, जी वर्तमानातील नको असलेल्या नशिबात इच्छित बदल घडवण्यासाठी आवश्यक आहे. जर सुरुवातीच्या प्रयत्नांनी प्रारब्धावर मात करण्यासाठी पुरेसे परिणाम मिळत नसतील, तर ते केवळ हे दर्शवते की, भूतकाळात आपला पुरुषार्थ चुकीच्या दिशेने होता आणि आता इच्छित बदल घडवून आणण्यासाठी पुढील पुरुषार्थाची आवश्यकता आहे. जोपर्यंत वर्तमानातील सकारात्मक पुरुषार्थ हा भूतकाळातील नकारात्मक पुरुषार्थाचे परिणाम शून्य करण्यासाठी प्रमाणात येत नाही, तोपर्यंत यशाची अपेक्षा मुळीच करता येणार नाही. हे तर्कसंगतच आहे. म्हणून, नशिबात इच्छित बदल घडवण्याचा मार्ग कधीही निराशा आणि प्रयत्नांचा त्याग हा असू शकत नाही, तर त्याऐवजी ओसंडून वाहणारी आशा आणि प्रयत्नांमध्ये दुप्पट वाढ हाच असला पाहिजे.

एक उदाहरण हा मुद्दा पुरेसा स्पष्ट करेल: लाकडाच्या ओंडक्यात एक खिळा ठोकलेला आहे आणि तो बाहेर काढण्याचे काम आपल्याला दिले आहे. आपल्याला खिळ्याची लांबी दिसत नाही कारण ती ओंडक्यात लपलेली आहे. आपल्याला लाकडाच्या गुणवत्तेबद्दलही माहिती नाही — ते मऊ आहे की कडक — कारण त्याला रंग लावलेला आहे. आता, जर एखाद्या व्यक्तीला विचारले की खिळा बाहेर काढण्यासाठी किती वेळा खेचावा लागेल किंवा किती तीव्र प्रयत्न करावे लागतील, तर त्याला उत्तर देणे शक्य होईल का? नक्कीच नाही! खिळा बाहेर काढताना वाटणारी सुलभता किंवा अडचण अनुभवण्यासाठी प्रत्यक्षात कामाला लागणे आवश्यक आहे. तो बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू केल्यानंतरही, किती वेळा खेचावा लागेल याचा अंदाज लावणे सोपे नसेल, कारण खिळ्याचा आकार नजरेच्या पलीकडे आहे. तरीही, वस्तुस्थिती हीच आहे की खिळा बाहेर काढण्यासाठी आवश्यक असलेल्या खेचण्याची संख्या आणि तीव्रता ही खिळा लाकडात ठोकण्यासाठी पूर्वी भूतकाळात दिलेल्या तडाख्यांची संख्या आणि तीव्रतेशी थेट प्रमाणात असेल. म्हणून, जोपर्यंत खिळा खेचण्याचा वर्तमान प्रयत्न हा तो आत ठोकण्यासाठी वापरलेल्या प्रयत्नांच्या प्रमाणानुसार, तोपर्यंत खिळा बाहेर येणार नाही. पण थोडा तरी आशावाद असलेली कोणतीही व्यक्ती केवळ खिळ्याची लांबी, लाकडाची गुणवत्ता, खेचण्याची संख्या आणि आवश्यक प्रयत्नांची तीव्रता माहीत नाही म्हणून स्वतःला खिळा बाहेर काढण्याच्या कामासाठी अक्षम मानू शकेल का? हे खरे नाही का की बुद्धिमत्ता आणि जीवनाची ओढ असलेले सर्वजण आपल्या प्रयत्नात टिकून राहतील, कारण खरोखर, आता या एवढ्या प्रमाणातल्या प्रयत्नाने नाही तर नंतर थोड्या अधिक प्रयत्नाने खिळा नक्कीच निखळेल. अशा सर्व प्रकरणांमध्ये कशाची गरज आहे ती म्हणजे सातत्य आणि फक्त सातत्य.

प्रारब्ध आणि पुरुषार्थाच्या बाबतीतही असेच आहे. आपला भूतकाळातील पुरुषार्थ किती विरुद्ध होता याची आपल्याला खात्री नाही. हे ज्ञान नसले तरी, वर्तमानातील सकारात्मक पुरुषार्थ यथावकाश नकारात्मक प्रारब्धाचा प्रभाव शून्य करेल आणि परिश्रम करणाऱ्याला नक्कीच विजय मिळवून देईल. "प्रयत्न करा आणि प्रयत्न करा, तुम्ही यशस्वी व्हाल," हे सर्व सिद्धींसाठी निश्चित असे सूत्र आहे. याच कारणामुळे ऋषी वसिष्ठ योगवासिष्ठामध्ये (२.५.११) श्रीरामाला असा सल्ला देतात की, जोपर्यंत नशिबावर विजय मिळत नाही तोपर्यंत प्रयत्न करत राहा आणि आपल्या प्रयत्नांमध्ये उत्साह कमी होऊ देऊ नका किंवा ध्येय गाठण्यापूर्वी अर्धवट सोडून देऊ नका.

**तावत्तावत्प्रयत्नेन यतितव्यं सुपौरुषम्।**
**प्राक्तनं पौरुषं यावदशुभं शाम्यति वयम्।।**

जोपर्यंत पूर्वकर्माचे दुष्ट प्रभाव (अशुभ) स्वतः शांत होत नाहीत, तोपर्यंत व्यक्तीने स्वतःच्या प्रयत्नांद्वारे (पुरुषार्थाने) अत्यंत परिश्रमपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत.

### शास्त्राचे मार्गदर्शन

अशी काही अत्यंत तीव्र प्रारब्धे (नशीब) आहेत का, ज्यांच्यावर आपले सर्वोत्तम प्रयत्न करूनही मात करणे अशक्य असेल? ओला, कोरडा दुष्काळ आणि तत्सम विलक्षण आपत्ती आपल्या सर्व वैयक्तिक प्रयत्नांना आणि स्वप्नांना पूर्णपणे हतबल करत असलेल्या दिसतात ना? मग 'स्वतःचे प्रयत्न सर्व काही साध्य करतात' हे गोड तत्त्वज्ञान, कितीही तर्कशुद्ध भासले तरी, खरे कसे असू शकते? बरं, केवळ सामान्य प्रयत्नांनी सर्व काही साध्य होणार नाही, परंतु ज्या प्रयत्नांना शास्त्रांचे मार्गदर्शन नाही अशा प्रयत्नांच्या तुलनेत, शास्त्रांवर आधारित असलेले प्रयत्न अशा अडचणींवरही विजय मिळवतात ज्या वरवर त्यांच्यावर मात करायला अगदी अशक्यप्राय भासतात.

स्पष्टीकरण: धर्म (कर्तव्ये/कृती) आणि ब्रह्म (वास्तव) या संदर्भात, ज्या गोष्टी आपण प्रत्यक्ष प्रमाण, अनुमान आणि ज्ञानाच्या इतर सामान्य साधनांद्वारे[४] जाणून घेऊ शकत नाही, त्यासाठी शास्त्र हा मार्गदर्शक प्रकाश आहे. एखादी कृती पुण्यदायी आहे की नाही, हा निष्कर्ष केवळ सामान्य ज्ञानाने काढता येत नाही, जरी कृतीचे स्वरूप ठरवण्यात सामान्य ज्ञानही महत्त्वाची भूमिका बजावते. आपण करत असलेल्या प्रत्येक कृतीचा एक परिणाम होतो, जो किफायतशीर किंवा तोट्याचाही असू शकतो, ज्याला अनुक्रमे 'पुण्य' आणि 'पाप' म्हटले जाते; आणि हे कृती पुण्यदायी होती की अन्यथा, यावर अवलंबून असते. पुण्य आणि पाप हे देखील इंद्रियांद्वारे कळत नाहीत. पुढे, आपल्या कृतीतून निर्माण झालेल्या पुण्य वा पापाचे बल किती, हे देखील इंद्रियजन्य ज्ञानाने किंवा अनुमानाने समजू शकत नाही. हे सर्व वर उल्लेखलेले विषय शास्त्राच्या अधिकारक्षेत्रात येतात. याच कारणामुळे भगवद्गीता (१६.२३-२४) म्हणते:

**यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः।**
**न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम्।।**
**तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ।**
**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि।।**

जो शास्त्रांच्या आज्ञा बाजूला सारून, इच्छेच्या आवेगानुसार कृती करतो, त्याला सिद्धी (परिपक्वता), सुख किंवा परम गती (ध्येय) प्राप्त होत नाही. म्हणून, काय करावे आणि काय करू नये (कर्तव्य आणि अकर्तव्य) हे ठरवण्यासाठी शास्त्र हेच तुमचे ज्ञानाचे साधन (प्रमाण) असू द्या. शास्त्रातील आज्ञांमध्ये काय सांगितले आहे हे जाणून घेऊनच, तुम्ही या जगात कार्य केले पाहिजे.

---

[४] अलौकिकविषये वेदाः प्रमाणम् – जे विषय लौकिक नाहीत त्याबाबत वेदच प्रमाण आहेत.

---

धर्मशास्त्रे हे कृतींसंबंधित ग्रंथ आहेत आणि ते काय अंगिकारावे आणि काय टाळावे याबद्दल पुरेसे आणि मौल्यवान मार्गदर्शन प्रदान करतात. एकदा का एखाद्याने धर्मशास्त्राचा आश्रय घेतला आणि त्यानुसार कृती केली, तर असे प्रयत्न नशिबावर मात करण्यासाठी पुरेसे शक्तिशाली बनतात. शास्त्र विशेष मार्गदर्शन करते आणि अशी अनोखी साधने प्रदान करते ज्याद्वारे नशिबाचा जो भाग सामान्यतः जिंकणे अशक्य असते तो देखील पराभूत होतो. स्वामी विद्यारण्य 'जीवन्मुक्ती-विवेक' (अध्याय १) मध्ये पाऊस पाडण्यासाठीच्या 'कारीरि इष्टि' या विशिष्ट वैदिक विधीचे उदाहरण देऊन, दिसायला अशक्य वाटणाऱ्या नशिबावर विजय मिळवण्यात शास्त्राधारित प्रयत्न हे केवळ मानवी प्रयत्नांपेक्षा

कसे बलशाली आहेत, हे स्पष्ट करतात. हे अशा संदर्भात आहे की: पूर्वपक्ष (विरोधक) युक्तिवाद करतो की कोणत्याही मानवी प्रयत्नाने मनाचा लय (नाश) कधीही होऊ शकत नाही, कारण मनाच्या अस्तित्वासाठी प्रारब्ध कारणीभूत असते. स्वामी विद्यारण्य स्पष्ट करतात की योगाभ्यास, म्हणजेच समाधीचा सराव—जे शास्त्राने ध्यात्यासाठी सुचवले आहे—त्याचे सामर्थ्य प्रारब्धापेक्षा जास्त आहे, आणि म्हणूनच समाधीच्या सरावाचा समावेश असलेल्या या शास्त्राधारित प्रयत्नाने प्रारब्ध-कर्मामुळे लादलेल्या मनाचा लय निश्चितच होतो:

**सत्यपि पुरुषप्रयत्ने कृष्यादेः फलपर्यवसानं यत्र न दृश्यते तत्र प्रबलेन कर्मान्तरेण प्रतिबन्धः कल्पनीयः। तच्च प्रबलं कर्म स्वानुकूलवृष्ट्यभावादिरूपां दृष्टसामग्रीं सम्पाद्यैव प्रतिबध्नाति। स च प्रतिबन्धो विरोधिना प्रबलेतरेणोत्तम्भकेन कारीरीष्ट्यादिरूपेण कर्मणापनीयते। तच्च कर्म स्वानुकूलां वृष्टिलक्षणां दृष्टसामग्रीं सम्पाद्यैव प्रतिबन्धमपनयति। किं बहुना? प्रारब्धकर्मण्येवात्यन्त भक्तेन भवता योगाभ्यासरूपस्य पुरुषप्रयत्नस्य वैयर्थ्यं मनसापि चिन्तयितुमशक्यम्।**

मानवी प्रयत्न करूनही जिथे शेती इत्यादींचे अपेक्षित फळ मिळत नाही, तिथे असे गृहीत धरले पाहिजे की एखादे बलवान प्रारब्ध-कर्म अडथळा आणत आहे. तेच प्रारब्ध-कर्म पावसाचा अभाव (दुष्काळ) यांसारखी दृश्य साधने निर्माण करून अडथळा आणते. त्या अडथळ्याचा प्रतिकार शास्त्राने सांगितलेल्या 'कारीरि' यज्ञासारख्या अत्यंत बलवान विरोधी प्रयत्नाद्वारे केला जातो, जो पावसासारखी अनुकूल साधने निर्माण करून तो अडथळा (म्हणजे दुष्काळ) दूर करतो. अधिक काय सांगावे? तुमच्यासारख्या प्रारब्ध-कर्माच्या शक्तीने पछाडलेल्या व्यक्तीला आम्ही सांगतो की, शास्त्राने सांगितलेल्या मानवी प्रयत्नांच्या, उदा. समाधीचा सराव, व्यर्थतेची कल्पनाही करणे देखील मनाला अशक्य आहे.

अशाप्रकारे, ज्या बाबींमध्ये सामान्य प्रयत्नांद्वारे नशिबावर मात करणे शक्य नसते, तिथे शास्त्र-मार्गदर्शित प्रयत्नांद्वारे त्यावर मात करणे शक्य होते. अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी, आपण विज्ञानाच्या क्षेत्रातील उदाहरणाने हे स्पष्ट करू शकतो: पृथ्वीवरील प्राण्यांसाठी, त्यांच्याकडे सहज उपलब्ध असलेल्या साधनांद्वारे, म्हणजे पर्वताच्या शिखरावरून उंच उडी मारणे वगैरे, पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणातून सुटणे आणि अंतराळात प्रवास करणे सामान्यतः अशक्य आहे. परंतु विज्ञानाचा आश्रय घेऊन, रॉकेटमधून प्रवास करणारा अंतराळवीर पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणातून सुटून अंतराळात जातो. अगदी त्याचप्रमाणे, शास्त्राने दिलेल्या विशेष साधनांद्वारे दिसायला अगम्य वाटणाऱ्या अडचणींवर मात केली जाते. म्हणूनच, स्वतःचे प्रयत्न खरोखरच सर्व काही साध्य करणारे आहेत. हा सर्व काही साध्य करणारा शास्त्राधारित स्वप्रयत्नांचा फायदा ध्यानी घेता वसिष्ठ ऋषी (योगवसिष्ठ २.४.८) श्रीरामाला निःसंदिग्ध रीत्या सांगतातः

**सर्वमेवेह हि सदा संसारे रघुनन्दन।**
**सम्यक्प्रयुक्तात्सर्वेण पौरुषात्समवाप्यते॥**

हे रघुकुलवंशजा (रामा), ह्या जगात सर्वांकडून सर्व खात्रीने मिळवणे शक्य आहे जर योग्य रीत्या प्रयत्न केले तर.

असेच एक शास्त्राधारित साधन आहे 'तप', म्हणजेच मन आणि इंद्रियांची एकाग्रता[५]. महाभारत (१२.१५५.५) त्याची प्रभावी शक्ती स्पष्ट करतेः

**यद्दुष्करं दुराराध्यं दुर्जयं दुरतिक्रमम् ।**
**तत्सर्वं तपसा साध्यं तपो हि दुरतिक्रमम्।।**

जे काही साध्य करणे कठीण आहे, किंवा ज्याची आराधना करणे कठीण आहे, किंवा जे दुर्गम आहे, किंवा ज्यावर मात करणे अत्यंत कठीण आहे — ते सर्व तपामुळे साध्य होते. पण तप साध्य करणे खरोखरच अवघड आहे!

---

[५] स्मृती तपाचे माहात्म्य आणि स्वरूप स्पष्ट करतेः मनसश्चेंद्रियाणां चैकाग्र्यं परमं तपः, तत् ज्यायः सर्वधर्मेभ्यः स धर्मः पर उच्यते – मन आणि इंद्रिये ह्यांची एकाग्रता हे सर्व तपांमधले सर्वोच्च तप आहे. सर्व सदाचारी कृतींमध्ये ही महान आहे आणि म्हणूनच सर्वाधिक पुण्य देणारी कृती आहे.

---

केवळ साध्या प्रयत्नांमुळे नव्हे, तर शास्त्र-आधारित स्व-प्रयत्नांचा समावेश असलेल्या अशा प्रबळ साधनांद्वारेच ऋषी विश्वामित्र एका संपूर्ण नवीन विश्वाची निर्मिती करू शकले; अर्जुन युद्धात स्वतः भगवान शिवाला प्रसन्न करू शकला आणि त्याने पाशुपत अस्त्र प्राप्त केले; ऋषी उद्दालक आणि वीतहव्य यांनी आपल्या इच्छेनुसार स्वतःचा देह त्याग करण्याची क्षमता प्राप्त केली — इतिहास आणि पुराणे शास्त्रामध्ये मूल अशा स्वप्रयत्नाच्या सामर्थ्याच्या उदाहरणांनी ठासून भरलेली आहेत. ऐतिहासिक काळातही, या महान भारतभूमीत श्री शंकराचार्य, समर्थ रामदास आणि स्वामी विद्यारण्य यांच्यासारख्या संतांचे जीवन-इतिहास आपल्यासमोर आहेत, आणि त्याचप्रमाणे इतर देशांतील संतांचेही इतिहास आहेत ज्यांनी त्यांच्या आध्यात्मिक पराक्रमाच्या बळावर यशाची उत्तुंग शिखरे गाठली आहेत. अलीकडच्या काळात, आपल्याकडे स्वामी विवेकानंद, स्वामी शिवानंद आणि स्वामी चिन्मयानंद यांच्यासारखे महापुरुष होऊन गेले, ज्यांनी आपल्याला आत्म्याचे आदर्श बल, म्हणजेच 'आत्म-शक्ती'ची आठवण करून दिली. केवळ आध्यात्मिक क्षेत्रातील संतांचेच का? एखाद्या अथक परिश्रम करणाऱ्या शास्त्रज्ञाचे, विजयी खेळाडूचे, यशस्वी उद्योजकाचे आणि इतरांचेही जीवन पहा — ज्यांनी उत्कृष्टतेची गगनचुंबी शिखरे सर केली आहेत — त्यांनी त्यांच्या कुठेही तडजोड न करणाऱ्या समर्पण आणि एकाग्रतेच्या बळावरच असे केले. ते सुद्धा 'तप'च आहे. ते सर्व अथक योद्धे आहेत, आणि योद्धे कधीच थकून हार मानत नाहीत.

शास्त्र-आधारित प्रयत्न देखील निरर्थक आहेत असा हेका धरणाऱ्यांना, स्वामी विद्यारण्य एका व्यावहारिक युक्तिवादाद्वारे (जीवनमुक्तिविवेक, अध्याय १) ही चूक पटवून देतात:

**यदि शास्त्रीयप्रयत्नस्य प्राबल्यं नाङ्गीक्रियते तदा चिकित्सामारभ्य मोक्षशास्त्रपर्यन्तां सर्वेषामानर्थक्यं प्रसज्येत। न हि कदाचित्कर्मफलविसंवादमात्रेण दौर्बल्यमापादयितुं शक्यम्; अन्यथा कादाचित्कं पराजयं दृष्ट्वा सर्वैर्भूपैर्गजाश्वादिसेनोपेक्ष्येत।**

जर तुम्ही शास्त्राने सांगितलेल्या स्वप्रयत्नाची परिणामकारकता मान्य केली नाही, तर वैद्यकशास्त्रापासून (औषधोपचार) ते थेट मोक्षशास्त्रापर्यंतच्या सर्वच गोष्टींची शास्त्रे निरर्थक ठरतील. केवळ कधीतरी एखाद्या प्रयत्नाचा योग्य परिणाम मिळाला नाही म्हणून सर्व प्रयत्न व्यर्थ आहेत असा निष्कर्ष काढता येत नाही. अन्यथा, युद्धात एखादा प्रसंगोपात्त पराभवाच्या वेळी सर्व राजांनी आपापल्या हत्तीघोड्यांचे सैन्य बरखास्त केले असते!

### मनावर नियतीचा (प्रारब्धाचा) परिणाम

असे प्रसंग येत नाहीत का, जेव्हा आपण आपल्या निर्णयांमध्ये आपल्या स्वप्रयत्नापेक्षा एका मोठ्या शक्तीचा हस्तक्षेप अनुभवतो आणि ती शक्ती आपल्याला आपल्याच इच्छेच्या विरुद्ध वागायला लावते? जरी एखाद्याला माहीत असले की हे योग्य नाही आणि ती कृती स्वतःसाठी निश्चितच हानिकारक ठरेल, तरीही माणसाला त्याच्या नियंत्रणाबाहेरच्या शक्तीद्वारे एखादे पाप कृत्य करण्यास भाग पाडले जाते, ज्याची मागून केवळ एक बोच टोचत (पश्चात्ताप) राहते. ती

शक्ती कोणती, जी आपल्या इच्छेपेक्षा अधिक सामर्थ्यवान आहे, जी आपले ज्ञान आणि इच्छा ह्याच्या विरुद्ध जाऊन आपल्याला असे पाप कृत्य करण्यास भाग पाडते जे आपल्याला मनापासून आवडत नाही? मनावर आणि बुद्धीवर पडणारा नियतीचा (प्रारब्धाचा) जबरदस्त प्रभावच नाही का हा? अशा प्रकारे, जेव्हा आपल्या स्वतःचे मन आणि बुद्धीच आपल्या नियंत्रणात नसते, तेव्हा आपल्याकडे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आणि करण्याची इच्छा आहे असा निष्कर्ष काढणे कितपत योग्य आहे?

आपल्या जीवनातील अशाच एका वरचढ शक्तीच्या अस्तित्वाचा विचार करून अर्जुन भगवद्गीतेमध्ये (३.३६) श्रीकृष्णाला हा प्रश्न विचारतो:

**अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः।**
**अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः॥**

परंतु, हे वार्ष्णेय (कृष्णा), माणसाची इच्छा नसतानाही, जणू काही एखाद्या शक्तीने भाग पाडल्यासारखा, माणूस कशामुळे प्रेरित होऊन पाप करतो?

थोडेसे चिंतन आणि विश्लेषण आपल्याला हे समजण्यास मदत करेल की ही शक्ती नियती (प्रारब्ध) असू शकत नाही. एक उदाहरण आपल्याला हे सत्य समजून घेण्यास मदत करेल: जेव्हा एखादी व्यक्ती अगदी पहिल्यांदा एखादे पाप कृत्य करते, समजा चोरी करते, तेव्हा तिला अतिशय भीती वाटत असते, धडधडत असते. दुसऱ्या वेळी, ते थोड्या कमी भीतीने केले जाते, आणि त्यानंतर, जसजसा तो वारंवार त्या पाप कृत्याला बळी पडतो, तसतसा तो अधिकाधिक निश्चिंत होत जातो, जिथवर जोवर चोरी करणे त्याच्यासाठी नैसर्गिक आणि अनायासे (सहज) होत नाही. त्या वेळी आपण म्हणतो: 'ती एक सवय झाली आहे'. त्यानंतर, अशा व्यक्तीला चोरी न करणे कठीण जाईल, जरी त्याला त्याच्या अंतर्मनात पूर्णपणे माहीत आहे की चोरी करणे चुकीचे आहे. असे नाही की तो त्याच्या नकारात्मक प्रवृत्तीवर मात करू शकत नाही, परंतु आता त्यासाठी त्याच्या बाजूने जबरदस्त अंतर्गत प्रयत्नांची (स्वप्रयत्नाची) आवश्यकता असेल, कारण आता त्याला चोरी करण्याची सवय जडली आहे.[६]

अशा सवयीला किंवा प्रवृत्तीला 'वासना' असे नाव दिले जाते, कारण ही सवयीची प्रवृत्ती सुप्त मनात (चित्तात) आपले स्थान बनवते (चित्ते वास्यमानत्वात्) आणि जागरूक मनावर ताबा मिळवते, ज्यामुळे ती व्यक्ती तिच्या आक्रमणापुढे वरवर असहाय्य वाटते[७]. लघु-योगवासिष्ठ ह्या ग्रंथामध्ये (५.१०.४८) वासनेची व्याख्या पुढीलप्रमाणे दिलेली आहे:

**दृढभावनया त्यक्तपूर्वापरविचारणम् ।**
**यदादानं पदार्थस्य वासना सा प्रकीर्तिता॥**

दृढ झालेल्या विचारामुळे प्रवृत्त होऊन मन एखाद्या वस्तूमध्ये बऱ्या वाईट परिणामांची क्षिती न करता अडकून राहाते, तेव्हा त्याला 'वासना' असे नाव दिले जाते.

---

[६] कुस्तीगीर, खिळा आणि चोरी ह्या उदाहरणांबद्दल लेखक 'द डायलॉग्स विथ द गुरू' (आर. कृष्णस्वामी अय्यर यांनी संकलित केलेले) या पुस्तकाचे आभार मानतात, ज्यामध्ये शृंगेरी मठाचे दिवंगत शंकराचार्य श्री स्वामी चंद्रशेखर भारती यांनी आपल्या शिष्यांना केलेले मार्गदर्शन समाविष्ट आहे.

[७] वासनांना 'संस्कार' या संज्ञेने देखील ओळखले जाते कारण त्या 'खोलवर रुजून स्थिर' राहतात.

नशीब आणि वासना या दोन्ही गोष्टी एकच नाहीत हे काळजीपूर्वक रीत्या बघितले पाहिजे, कारण व्याख्येनुसार नशीब हे 'अदृष्ट' म्हणजेच न दिसणारे आहे, तर वासना म्हणजेच सवयीची प्रवृत्ती, काटेकोररीत्या 'अदृष्ट' या वर्गीकरणात येऊ शकत नाही. कारण वासनांचे स्वरूप स्वतःला प्रगट करणे आणि तीव्र विचारांच्या माध्यमातून स्वतःला पुढील दोन रूपांपैकी एका रूपात समोर आणणे हेच आहे: (१) काम-राग म्हणजेच तीव्र, अनावर इच्छा, किंवा (२) क्रोध-द्वेष म्हणजेच तीव्र तिरस्कार. आणि हाच काम-राग किंवा क्रोध-द्वेष माणसाला पाप करण्यास भाग पाडतो, जरी त्याला ते चुकीचे आहे हे माहीत असते आणि त्याची ती पापकर्म करण्याची इच्छा नसते तरीही.

म्हणूनच, श्रीकृष्ण अर्जुनाच्या प्रश्नाचे -कोणती शक्ती माणसाला त्याच्या इच्छेविरुद्धही पाप करण्यास प्रवृत्त करते ह्या विषयीचे उत्तर असे देतात की (भगवद्गीता ३.३७):

**काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः।**
**महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम्॥**

हा काम आहे, हा क्रोध आहे, जो रजोगुणापासून उत्पन्न होतो — कधीही न तृप्त होणारा आणि खरोखर मोठा पापी. आहे. यालाच या संसारात (जीवाचा) शत्रू समज.

